SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR– 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell**: 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९००० सांख्यिकी कक्ष :०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/विद्यार्थी माहिती/२०२५-२६/** 169 **दिनांक :** 09/03/2026

## स्मरणपत्र

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था.**

**विषय : आपल्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना/अनुदानित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती सादर करणे बाबत**

**संदर्भ :** १. या कक्षाकडून दि. १७/०२/२०२६ रोजी पाठविण्यात आलेला ई-मेल व स्मरणपत्र
२. या कक्षाकडून दि. ३०/१२/२०२५ रोजी पाठविण्यात आलेला ई-मेल
३. या कक्षाकडून दि. २३/१२/२०२५ रोजी पाठविण्यात आलेला ई-मेल
४. या कक्षाकडून दि. ०४/१२/२०२५ रोजी पाठविण्यात आलेला ई-मेल व परिपत्रक
५. जा.क्र.विशेष कक्ष/२०२५-२६/९१०/७०, दिनांक-२८ मार्च, २०२५ रोजीचे परिपत्रक

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकिंत पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालयाची **शैक्षणिक वर्ष २०२५-२६** मधील **प्रवेशित विद्यार्थी संख्येची प्रवर्गनिहाय माहिती** ई-मेलवर पाठविण्यात आलेल्या एक्सेल विवरणपत्रात भरुन तात्काळ या कक्षास पाठवून द्यावी असे परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते तसेच सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही ठेवण्यात आले होते. माहिती वेळेत देण्या-संदर्भात आपल्या महाविद्यालयाला वारंवार ई-मेल व दुरध्वनीच्या माध्यमातून कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप आपल्या महाविद्यालयाकडून उपरोक्त विषयास अनुसरून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. सदरची माहिती आपल्या कडून प्राप्त न झाल्याने स्थायी समिती व शासनाला पाठविण्यास दिरंगाई होत आहे.

**सदर विद्यार्थ्यांची माहिती वेळेत सादर न केल्यास आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्येची माहिती उपरोक्त समितीस व शासनास निरंक म्हणून कळविण्यात येईल.** सदर निरंक संख्येबाबत काही प्रश्न उध्दवल्यास आपले महाविद्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**